असा. क्र. ३८५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, डिसेंबर १२, २००१/अग्रहायण २१, शके १९२३

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार-ब

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांच्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ डिसेंबर २००१

**अधिसूचना**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८.**

क्रमांक व्हीपीएम. २६९९/प्र.क्र.८८५/२२.—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५८ चा मुंबई ३) च्या कलम १७६ चा पोट कलम (२) चा खंड (सत्वीस) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या व त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन याद्वारे, महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे. हे नियम उक्त कलम १७६ चे पोट-कलम (४) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आले होते :—

१. या नियमांना महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (पहिली सुधारणा) नियम, २००१ असे संबोधण्यात येईल.

२. महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील नियम ९ च्या पोट-नियम (१) ऐवजी खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात येईल :–

" (१) सरपंचाने पुढील गोष्टी दर्शविणारी आकारणीची यादी तयार केली पाहिजे किंवा केलेली असली पाहिजे :—

(अ) प्रत्येक इमारतीचा किंवा जमिनीचा अनुक्रमांक ;

(ब) प्रत्येक इमारतीचा प्रकार म्हणजेच ती पुढील प्रकारची आहे किंवा कसे, —

(१) झोपडी किंवा मातीचे घर—

(क) गवती छप्पर,

(ख) पत्रा किंवा कौलारु छप्पर, किंवा

(२) दगड-विटांचे, मातीचे घर, किंवा

(३) दगड-विटांचे, चुना किंवा सिमेंटचे पक्के घर—

(क) पत्रा अगर कौलारु छप्पर,

(ख) आर.सी.सी. स्लॅब, किंवा

(४) नवीन आर.सी.सी. पद्धतीचे घर, किंवा

(५) मारबल किंवा ग्रॅनाईट यांचा वापर करून बांधलेली अलिशान घरे.

(क) तिच्या माहिती असलेल्या मालकाचे व ती ताब्यात असणाऱ्याचे नाव :

(ड) तिचे क्षेत्रफळ ;

(इ) तिच्या एकूण क्षेत्रफळाच्या आधारे तिच्यावर आकारण्यात आलेल्या कराची रक्कम :

परंतु, राज्य शासन किंवा यथास्थिति स्थायी समिती तसे करण्यास भाग पाडील तर, पंचायतीस, मूल्य निर्धारित सूची तयार करण्याचे काम, शासनाच्या किंवा जिल्हा परिषदेच्या सेवेमधील अधिकाऱ्याकडे (ज्याचा यापुढे " मूल्य निर्धारण अधिकारी " असा उल्लेख केला आहे) सोपविता येईल ".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कुंदा गोसावी,
शासनाच्या उप सचिव.

Scanned by CamScanner

## RURLAL DEVELOPMENT AND WATER CONSERVATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 32, dated 12th December 2001.

*NOTIFICATION*

BOMBAY VILLAGE PANCHAYAT ACT, 1958.

No VPM.2699/CR-885/22.—In exercise of the powers conferred by clause (xxvi) of sub-section (*2*) of section 176 of the Bombay Village Panchayats Act, 1958 (Bom. III of 1959), and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra makes the following rules further to amend the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules 1960, the same having been previously published as required by sub-section (*4*) of the said section 176, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees (First Amendment) Rules, 2001.

2. In rule 9 of the Maharashtra Village Panchayats Taxes and Fees Rules, 1960 for sub-rule (*1*), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(*1*) The *Sarpanch* shall prepare or have prepared an assessment list showing,—

(*a*) the serial number of each building or land;

(*b*) the type of each building, that is to say, whether it is,—

(*1*) Hut or Mud house—

(*i*) Roof of grass,

(*ii*) Roof of sheet or mangalori tiles, or

(*2*) Bricks or stone house built in clay, or

(*3*) Pucca house in stone, brick and lime or cement—

(*i*) Roof of sheet or mangalori tiles,

(*ii*) R.C.C. Slab; or

Scanned by CamScanner

(4) New R.C.C. type house, or

(5) Royal houses built up by marble or granite.

(c) the name of the owner and the occupier, if known;

(d) its area;

(e) the amount of tax assessed on its area :

Provided that, the Panchayat may and, if so required by the State Government or the Standing Committee, shall entrust the preparation of the assessment list to an officer in the service of the Government or of the Zilla Parishad, as the case may be (hereinafter referred to as the "Assessment Officer")".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

KUNDA GOSAVI,
Deputy Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

Scanned by CamScanner